# लोकनेते दत्ताजी पाटील सहकारी बँक लि.लासलगाव

यशश्री बिल्डींग,स्टेशन रोड ,लासलगाव ता.निफाड जि.नाशिक ४२२३०६
फोन.न (२५५०)२६६१०४,२६६५४७,२६८०४७ Email :- ldpbank@gmail.com

---

## ५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना

दि.१२.०९.२०२३

**(फक्त सभासदांसाठी)**

बँकेच्या सर्व भागधारक सभासदांना सुचित करण्यात येते की, लोकनेते दत्ताजी पाटील सहकारी बँक लि. लासलगाव या बँकेची ५२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि.२७.०९.२०२३ रोजी सकाळी ११.०० वा कमलाकर सिनेमा,(टॉकीज) स्टेशन रोड,लासलगाव ता.निफाड जि.नाशिक ४२२३०६ या ठिकाणी बँकेचे चेअरमन मा.**श्री.नानासाहेब दत्ताजी पाटील** यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयावर निर्णय घेण्यासाठी आयोजित केलेली आहे.तरी सदर सभेस वेळेवर उपस्थित राहावे,हि नम्र विनंती.

## ** सभेपुढील विषय **

१. बँकेच्या दिनांक २७.०९.२०२२ च्या ५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
२. आर्थिक वर्ष २०२२-२०२३ चे वैधानिक लेखापरीक्षकांनी तपासलेले ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे तसेच वैधानिक लेखापरीक्षणाच्या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
३. मा.संचालक मंडळाने शिफारस केलेल्या आर्थिक वर्ष २०२२-२०२३ च्या नफा विभागणीची नोंद घेणे व त्यास मंजुरी देणे.
४. आर्थिक वर्ष २०२३-२०२४ साठी संचालक मंडळाने शिफारस केल्यानुसार अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणुक करणे.
५. आर्थिक वर्ष २०२३-२०२४ साठी मा.वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणुक रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार करणे.
६. मा.संचालक मंडळाने तयार केलेला आर्थिक वर्ष २०२२-२०२३ चा अहवाल व शिफारस केलेल्या आर्थिक वर्ष २०२३-२०२४ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे व आर्थिक वर्ष २०२२-२०२३ च्या अदांजापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.
७. रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार व संचालक मंडळाच्या शिफारशीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नेमणुकीस मंजुरी देणे.
८. वसुलीचे हक्क कायम ठेवुन मा.वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेल्या संशयित व बुडीत कर्ज खात्यांचे निर्लेखित (write-off) करणे.
९. मा.संचालक मंडळाने शिफारस केलेल्या पोटनियम क्रमांक ६२(सी) दुरूस्तीस मान्यता देणे.
१०. नफा वाटणीतुन निर्माण केलेल्या विविध निधींच्या पुन:वर्गीकरणास मान्यता देणे.
११. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या तसेच रिझर्व्ह बँकेकडुन मान्यता मिळलेल्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंटची नोंद घेणे.
१२. रिझर्व्ह बँकेच्या दिशा निर्देशनानुसार केवायसी अपुर्तता असलेल्या ग्राहकांची केवायसी अद्यावत करण्याबाबत विचार करणे.
१३. **Rare Assets Recontrauction Company Ltd** .या कंपनीला विकलेल्या एनपीए ॲसेट खात्यास मान्यता देणे.
१४. मा.संचालक मंडळाने शिफारस केलेल्या कर्मचारी सेवानियम, वेतनश्रेणी, स्टाफींग पॅटर्न यांना मान्यता देणे.
१५. मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

**स्थळ:-लासलगाव**

मा.संचालक मंडळाचे आज्ञेवरुन
श्री.दिपक मधुकर धात्रक
मुख्य कार्यकारी अधिकारी

---

सुचना :- गणपुर्ती अभावी सभा अर्धा तास तहकुब ठेवुन त्यानंतर सभेचे कामकाज त्याचठिकाणी विषय पत्रिकेत नमुद केलेल्या विषयांचा विचार करण्यासाठी सुरु केले जाईल.सदर सभेसाठी गणपुर्ती आवश्यकता राहणार नाही.

## सभासदांसाठी महत्वाच्या सुचना

१. आर्थिक वर्ष २०२२-२०२३ चा बँकेचा अहवाल,ताळेबंद व नफातोटा पत्रक,आपल्या बँकेच्या www.ldpbank.com या संकेत स्थळावर देखील पाहता येईल.तसेच बँकेचा अहवाल आपल्या नजिकच्या शाखेत उपलब्ध करुन देण्यात येईल.
२. ज्या सभासदांना वार्षिक सर्व साधारण अहवाल सालातील बँकेच्या सर्व सामान्य कामकाजाबाबत प्रश्न विचारावयाचे असतील किंवा ठराव मांडवयाचे असतील त्यांनी ते दिनांक २२.०९.२०२३ पर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयात लेखी स्वरुपात कळवावेत.त्यानंतर आलेल्या सुचनांचा विचार केला जाणार नाही.
३. सभासदांची नांवे,निवास -पत्ता किंवा वारसदार यांच्यामध्ये बदल झाला असल्यास,त्यांनी आपल्या नजिकच्या शाखेत किंवा मुख्य कार्यालयातील शेअर्स विभागास लेखी कळवावे.
४. रिझर्व्ह बँकेने सर्वच खात्यांना सी-केवायसी करणे अनिवार्य केले आहे.तरी ज्या सभासदांचे आपल्या बँकेत खाते आहे.त्यांनी सी-केवायसी ची पुर्ततेसाठी अद्यावत फोटो,सही ,आयडीप्रूफ व पत्याचा पुरावा घेवुन नजिकच्या शाखेत जाऊन पुर्तता करुन घ्यावी.